Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 13/08/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटल्या, आतल्या वाटल्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष



## नाटककार, दिग्दर्शक विश्राम बेडेकर

विश्राम बेडेकर ऊर्फ विश्वनाथ चिंतामणी बेडेकर हे चित्रपट निर्माते, पटकथालेखक आणि नाट्यलेखक होते. त्यांचा जन्म १३ ऑगस्ट १९०६ रोजी अमरावती येथे झाला. अमरावती येथे महाविद्यालयीन पदवी प्राप्त केल्यानंतर ते पदव्युत्तर शिक्षणासाठी नागपूरला गेले. कॉलेजच्या दिवसांतच ते इंग्रजी साहित्य आणि रंगभूमीकडे ओढले गेले.'बळवंत पिक्चर्स' कंपनीसाठी बेडेकरांनी 'कृष्णार्जुन युद्ध' हा चित्रपट सहदिग्दर्शित केला होता. त्यानंतर 'ठकीचे लग्न', 'सत्याचे प्रयोग' या दोन बोलपटांचेही दिग्दर्शन केले. बेडेकरांनी 'ब्रह्मकुमारी', 'नरो वा कुंजरो वा' (१९६१), 'वाजे पाऊल आपुले' (१९६७) आणि 'टिळक आणि आगरकर' (१९८०) ही नाटके लिहिली. यापैकी 'टिळक आणि आगरकर' हे नाटक लोकमान्य टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर या स्वातंत्र्य सेनानींच्या मैत्रीत येणाऱ्या वितुष्टावर आधारित आहे.

बेडेकरांच्या 'रणांगण' या कादंबरीने साहित्यक्षेत्रात खळबळ उडवली. ती फार लोकप्रिय ठरली. धर्मविरोधी व राष्ट्रविरोधी विचारांवर टिप्पणी करणे तसेच कशाचा तरी घटक असणे म्हणजे नेमके काय, याबाबत प्रश्न विचारणे, ही बेडेकरांची मुख्य प्रेरणा होती. 'ठकीचं लग्न', 'सत्याचे प्रयोग', 'वासुदेव बळवंत', 'नारदनारदी', 'कृष्णार्जुन युद्ध', 'चूल आणि मूल', 'रामशास्त्री' तसेच 'पहिला पाळणा' हे मराठी, तर 'एक नन्ही मुन्ही लडकी थी' आणि 'लाखाराणी' या हिंदी चित्रपटांचे श्रेय बेडेकरांना जाते. बेडेकरांनी १९८० साली 'एक झाड दोन पक्षी' नावाने आत्मचरित्र लिहिले. या पुस्तकासाठी त्यांना १९८५ सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. १९८८ मध्ये मुंबईत झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषवले. विश्राम बेडेकर यांचे ३० ऑक्टोबर १९९८ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Aug 13, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401